आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# 'टेकएक्सप्लोर २०२६' राष्ट्रीय विद्यार्थी इनोव्हेशन परिषद उत्साहात




**नाशिक :** के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार (ई अँड टीसी) विभाग व 'स्पार्क क्लब' यांच्या संयुक्त विद्यमाने 'टेकएक्सप्लोर २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थी इनोव्हेशन परिषद नुकतीच संपन्न झाली.

या परिषदेत देशभरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून मोठ्या संख्येने संशोधनपत्रे प्राप्त झाली असून त्यापैकी निवडक संशोधनपत्रांचे ऑनलाइन व ऑफलाइन सत्रांद्वारे सादरीकरण करण्यात आले. या परिषदेत एकूण १०० अप्रत्यक्ष सादरीकरणे प्राप्त झाली, त्यापैकी ७० पूर्ण संशोधनपत्रे सादर करण्यात आली आणि ४६ संशोधनपत्रांची अंतिम निवड करण्यात आली. यामध्ये १० ऑनलाइन तर ३६ प्रत्यक्ष सादरीकरणांचा समावेश होता. परिषदेअंतर्गत ५जी, ६जी व प्रगत संप्रेषण, सेमीकंडक्टर व लो पॉवर चिप डिझाईन, एम्बेडेड सिस्टिम्स व आयओटी, सिग्नल प्रोसेसिंग व मशीन लर्निंग, हार्डवेअर सिक्युरिटी, रोबोटिक्स व ऑटोमेशन तसेच बहुविषयक क्षेत्रांतील संशोधन विषयांचा समावेश होता.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक येथील हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड एअरक्राफ्ट अपग्रेड रिसर्च अँड डिझाईन सेंटरचे डेप्युटी जनरल मॅनेजर प्रशांत के. मोडक व चिफ मॅनेजर नृपेश कुमार उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डीन प्रा. एस. वाय. कुटे, विभागप्रमुख डॉ. सुनिता पाटील देखील उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे संयोजिका म्हणून डॉ. अंशु गुप्ता यांनी कामकाज केले. या परिषदेच्या यशस्वी आयोजनामुळे विद्यार्थ्यांना इनोव्हेशन, संशोधन व तांत्रिक सादरीकरणासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले.